Scan QR code
to visit...
Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code
to visit...
Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८५ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.७ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## कल्याणमध्ये आम्ही लढू म्हणणारे वाघ आता कुठे गेले?

# उमेदवारी जाहीर होताच श्रीकांत शिंदेंची वरुण सरदेसाई, आदित्य ठाकरेंवर टीका

**मुंबई (वृत्तसंस्था)**–कल्याणमध्ये वाघ फिरत होते, आम्ही लढू म्हणत होते ते आता कुठे गेले? असा खोचक टोला खासदार श्रीकांत शिंदे यांनी उमेदवारी जाहीर होताच युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. तसेच कल्याणमध्ये मी प्रचंड मतांनी विजयी होईल असा विश्वास देखील उमेदवारीवरी जाहीर होताच श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी श्रीकांत शिंदे यांनी आदित्य ठाकरेंवर खोचक टीका केली आहे. ''कल्याणमध्ये काही मोठे मोठे नेते वल्गना करत होते. वाघ फिरत होते. आम्ही लढू म्हणत होते ते वरुण सरदेसाई आणि आदित्य ठाकरे आता कुठे गेले. मतदारसंघातील काम पाहून कल्याणमध्ये उभे राहण्याची हिंमत कोणाची झाली नाही म्हणूनच एका कार्यकर्त्याला इथे उमेदवारी दिली. तुम लढो हम कपडा संभालते हैं असे त्यांचे धोरण आहे'', असा हल्लाबोल श्रीकांत शिंदेंनी केला.पुढे श्रीकांत शिंदे म्हणाले, कल्याण लोकसभा मतदारसंघाचा विषय स्पष्ट होता. कल्याणमध्ये युतीचे कार्यकर्ते, नेत्यांच्या बैठका, गाठीभेटींना सुरुवात झाली आहे. मंत्री रविंद्र चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष, शहर अध्यक्ष, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते हे सगळे मिळून एकदिलाने कामाला लागले आहेत. प्रचाराला सुरुवात झाली आहे. मी फडणवीसांच्या निर्णयाचे स्वागत करतो. कल्याण लोकसभेमधून मी मोठ्या मताधिक्क्याने जिंकून येईल'', असे श्रीकांत शिंदे म्हणाले.तसेच आमदार गणपत गायकवाड यांच्या समर्थकांकडून होणाऱ्या विरोधावर देखील श्रीकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ''विरोध करणाऱ्यांचा काही वैयक्तिक अजेंडा असेल तर तो त्यांनी वैयक्तिकरित्या राबवला पाहिजे. पक्षाचं नाव घेऊन युतीचं वातावरण खराब करू नये. गुंड प्रवृत्तीने कोणी वागत असतील तर त्यांचा काय अजेंडा आहे, हे स्पष्ट झालं पाहिजे. कल्याणमध्ये मोठ्या प्रमाणात विकास केलेला आहे. राज्य सरकार, केंद्र सरकारने मदत केली आहे. परंतु, त्यांचा अजेंडा वातावरण खराब करण्याचा आहे'', असे श्रीकांत शिंदे म्हणाले.दरम्यान, कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपाचा उमेदवार किंवा कमळ चिन्हावर लढणारा उमेदवार असेल तर त्याचे काम आम्ही करू अशाप्रकारचे सह्यांचे एक निवेदन आमदार गायकवाड समर्थकांकडून भाजप प्रदेशाध्यक्षांना पाठविण्यात येणार आहे. असे एका आमदार गायकवाड समर्थकाने सांगितले. कोणत्याही परिस्थितीत कल्याण पूर्वेतील भाजपा पदाधिकारी कार्यकर्ता हा श्रीकांत शिंदे यांचे काम करणार नाही, अशी चर्चा आम्ही केली असल्याचे या कार्यकर्त्याने सांगितले. याबाबत श्रीकांत शिंदे बोलत होते.



## वाघाच्या हल्ल्यात गाय ठार

### कोसरसार शेतशिवारात वाघाचा वावर



**वरोरा । प्रतिनिधी**

कोसरसार शेतशिवारात गुरुवारी गोठ्यात बांधून असलेल्या गाई वर वाघाने हल्ला चडवत ठार केली ही गाय जितेंद्र तडस यांच्या मालकीची असून ते नेहमीप्रमाणे शुक्रवार ला शेतात गेले असता गोठ्यात गाय दिसली नाही.त्यांनी चौकशी केली असता शेताला लागून असलेल्या नहरात झाडाझुडपात गाय मृत अवस्थेत आढळून आली त्यांनी तात्काळ माहिती समाजसेवक गणेश उराडे यांना दिली त्यांनी वनविभागाला कळवताच वनविभागाचे वनधिकारी चांभारे आणी वनरक्षक वेदांती यांना माहिती दिली. माहिती दिल्याबरोबर तिथे कॅमेरा लावण्यात आला आणी त्या ठिकाणी जाऊन जागेचा पंचनामा केला.

गाय ही गाभण असल्याने त्या शेतकऱ्याचे ५० हजाराचे नुकसान झाले आहे. त्या शेतकऱ्याला तात्काळ मदत मिळायला पाहिजे अशी मागणी समाजसेवक गणेश उराडे यांनी केली आहे. आम्ही लवकर मदत मिळवून देऊ असे आश्वसन वन अधिकारी यांनी दिले आहे.



नागभीड तालुक्यातील तुकूम – कोदेपार रस्त्यावर मक्याचे पीक जोमात आले असुन रस्त्याने ये – जा करणाऱ्याचे मन वेधून घेत आहेत.छाया :प्रणय बांगरे.

## गडचिरोली चिमूर लोकसभा मतदारसंघात २४ हजार नवमतदार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघात १८ ते १९ वयोगटातील २४ हजार २६ नवमतदारांनी नोंदणी केली आहे यात १३ हजार २६१ पुरुष तर १० हजार ७६४ महिलांचा समावेश आहे.

१२–गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघातील आमगाव, आरमोरी, गडचिरोली, अहेरी, ब्रम्हपुरी आणि चिमुर हे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. या विधानसभा मतदारसंघातील १८ त१९ वयोगटाच्या नवमतदारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे. आमगाव – १७१५ पुरुष आणि १३६५ महिला, एकूण ३०८०, आरमोरी–१८४८ पुरुष आणि १५४४ महिला एकूण ३३९२, गडचिरोली २७८४ पुरुष आणि २२८७ महिला एकूण ५०७१, अहेरी २१०२ पुरुष आणि १५०९ महिला व एक तृतियपंथी असे एकूण ३६१२, ब्रम्हपुरी – २४५८ पुरुष आणि २०२३ महिला एकूण ४४८१, चिमुर – २३५४ पुरुष आणि २०३६ महिला एकूण ४३९० मतदारांनी नोंदणी केली आहे.

## ७ एप्रिल रोजी जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर प्रादेशिक हवामान विभागाकडून मिळालेल्या सुचनेनुसार ७ एप्रिल २०२४ रोजी चंद्रपूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची तसेच गारपीटची शक्यता वर्तविण्यात आल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने कळविले आहे. नागरिकांनी दक्ष राहण्याच्या सुचनाही प्रशासनाने दिल्या आहेत.





## चिंधिचक बसस्टॉपवर अपघातात एक विद्यार्थी ठार, एक शिक्षिकेसह एक विद्यार्थी जखमी

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना घेवून जात असलेल्या शिक्षिकेच्या स्कुटीला ट्रकने जोरदार धडक दिल्याने एक विद्यार्थी जागीच ठार तर एका विद्यार्थ्यासह शिक्षिका गंभिर जखमी झाल्याची घटना आज सकाळी ७ वाजताचे दरम्यान चिंधिचक बसस्टँड वर घटली.

नागभिड पोलिस स्टेशन अंतर्गत येतं असलेल्या चिधिमाल येथिल विद्यार्थी कुनाल वलधरे वर्ग ९ वा, अनिकेत विठोबा शेंडे वर्ग ६ वा, हे विद्यार्थी प्रशांत विद्यालय किटाळी (बो.) येथे शिक्षण घेत होते.याच विद्यालयाची शिक्षिका अश्विनी बाबाराव पाटील मु+ तळोधी ही नेहमिच या विद्यार्थ्यांना शाळेत घेवून जात होती. नेहमी प्रमाणे आजही सकाळच्या शाळेला सात वाजताचे दरम्यान या विद्यार्थ्यांना घेवुन जात असतांना चिंधिचक बसस्टॉप वरून वळण घेत असतांना नागभिड कडुन भरधाव वेगाने येतं असलेला ट्रकने



जोरदार धटक दिली. यात स्कूटी समोरील ट्रकचे चाकात विस ते तिस फुट फरकळत गेल्याने अनिकेत विठोबा शेंडे (वय१२ वर्ष) हा जागिच ठार झाले तर दुसरा मुलगा कुनाल वलधरे (वय १५ वर्ष )हा ट्रकचे समोरिल चाकात अटकून राहिला. तब्बल दोन तासांचे रेस्क्यु नंतर त्याला जिवंत काढण्यात यशं आले मात्र त्यांच्या पायाचा चेंदामेंदा झाला. स्कूटी चालक शिक्षिका ट्रकच्या धटकेने उसळुन पडल्याने तिच्या पायाला गंभिर दुखापत झाली. घटनेची माहिती पसरताच परिसरातील हजारो जनसमुदाय घटनास्थळी जमला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ब्रम्हपूरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी दिनकर ठोसरे, नागभिडचे ठाणेदार विजय राठोड, तळोधीचे ठाणेदार अजितसिंग देवरे घटनास्थळी ताफ्यासह दाखल झाले. अधिक तपास नागभिड पोलिस करीत आहे.

## माजी मंत्री बबनराव घोलप शिंदेंच्या शिवसेनेत दाखल

**नाशिक**–शिवसेना ठाकरे गटात नाराज असलेले माजी मंत्री बबनराव घोलप यांनी आज अखेर शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. दोन महिन्यांपूर्वीच बबनराव घोलप यांनी उद्धव ठाकरेंकडे आपल्या पदाचा राजीनामा सोपवला होता. मात्र ठाकरेंकडून कुठलेही उत्तर न आल्याने त्यांनी आज अखेर शिंदे गटाची वाट निवडली. बबनराव घोलप यांच्यासह माजी आमदार संजय पवार यांनी देखील एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.



माजी मंत्री राहिलेले बबनराव घोलप उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार आहे. मात्र त्यांचे पुत्र योगेश घोलप यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार की उद्धव ठाकरे बरोबर राहणार? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. घोलप यांच्यासोबत आणखी काही पदाधिकारी शिंदे गटात जाणार असल्याची शक्यता आहे.

नाशिकमध्ये नुकतेच झालेल्या ठाकरे गटाच्या अधिवेशनालादेखील बबनराव घोलप उपस्थित नव्हते. तेव्हापासून ते उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार असल्याची चर्चा रंगली होती. बबनराव घोलप पाच वेळा आमदार राहिले आहे. १९९० ते २०१४ दरम्यान नाशिकमधील देवळाली विधानसभा मतदार संघातून ते निवडून आले आहे. आता शिर्डीमधून निवडणूक लढवण्याची त्यांची इच्छा होती. परंतु उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे तिकीट न मिळाल्याने ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होत आहे.बबन घोलप हे शिवसेनेचे जेष्ठ नेते आहेत. त्यांनी मंत्रीपदही भूषविले आहे. शिवसेनेत फुट पडल्यानंतरही त्यांनी ठाकरे गटातच राहण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यानच्या काळात खासदार हेमंत गोडसेंसह शिंदे गटात अनेकांनी प्रवेश केला. पण, घोलप यांनी ठाकरे गटातच राहणे पसंत केले होते.

## बल्लारपुरात संगणकाच्या दुकानाला भीषण आग

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य मार्गावरील दुर्गामाता सार्वजनिक मंदिराजवळील एका संगणकाच्या दुकानाला भीषण आग लागली. या आगीत लाखोंचा ऐवज जळाला आहे. ही घटना शनिवार,६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता घडली.

या आगीवर बल्लारपूर नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने वेळीच नियंत्रण मिळविल्याने मोठा अनर्थ टळला.

बल्लारपूर शहरातील मुख्य मार्गादरम्यान गुरुद्वाराजवळ दुर्गामाता मंदिर परिसरात सचिन बावणे यांच्या मालकीचे प्रभू कॉप्युटरचे दुकान आहे. या दुकानाजवळून ये–जा करणाऱ्या नागरिकांना सकाळी १०.३० वाजताच्या दरम्यान आगीचे लोळ दिसले. यामुळे परिसरातील नागरिक भयभित झाले. दुकानाच्या मागील भागात वस्ती आहे. वस्तीला आगीची झळ लागू नये म्हणून तातडीने अग्निशमन



दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या पथकाने शर्थीचे प्रयत्न करून एका तासाने आगीवर नियंत्रण मिळविले. यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला. दुकानातील २५ ते ३० संगणक, लॅपटॉप, दुकानात दुरुस्तीसाठी आलेले लॅपटॉप व संगणक आगीत जळले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दुकानाला शार्टसर्किटमुळे आग लागली असल्याचे बोलले जात आहे.

## मोबाईलमुळे शालेय मुलांच आयुष्य धोक्यात

**चिमूर । प्रतिनिधी**

प्रत्येक आई–वडिलांना वाटते की, आपला मुलगा शिकून मोठा व्हावा, त्याने आपल्या जीवनात प्रगती करावी, त्यातून आपल्यालाही आर्थिक हातभार मिळावा असा उद्देश प्रत्येकांचा असतो. परंतु सध्या लहान मुले व शालेय विद्यार्थी असो की कॉलेजमधील विद्यार्थी हे पूर्णपणे मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे त्यांचे आयुष्य उध्वस्त होण्याची वेळ आली असून हे मुले सकाळ संध्याकाळ कोणते ही काम न करता सतत मोबाईलचे वापर करीत असल्याने मोबाईलमुळे अशा मुलांच्या मेंदूवर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे.

आज लहान्या पासून तर मोठ्या पर्यंत मोबाईलचा वापर सर्रास सुरू आहे. जणू मोबाईलची सवय ही प्रत्येकालाच जडलेली असल्याचे दिसते. शाळा सुटल्यानंतर ही मुले अनेक चौका चौकात तसेच शाळेच्या



प्रांगणात गटागटाणे मोबाईलवर गेम खेळत असल्याचे अक्षरशा दिसून येत आहे. ही मुले रात्री सुद्धा अभ्यास न करता झोपेपर्यंत अंगावर पांघरून घेऊन गेम खेळत बसतात. त्यामुळे त्याच्या शिक्षणावर तर परिणाम होतोच परंतु अशा वेळेस पुरेपूर झोप न झाल्याने व जवळून मोबाईल बघितल्याने त्यांच्या डोळ्यावर आणि मेंदूवर सुद्धा विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

ही मुले घरचे कोणतेही काम सांगितल्यास काम न करता सतत चिडचिड करीत असतात. ही मुले विसरभोळेही बनतात व अशा मुलांची आठवण क्षमता ही दिवसेंदिवस कमी होत जाते. सततच्या मोबाईलच्या वापरामुळे अशा मुलांना वर्गात शिक्षकांनी शिकविलेले काहीच लक्षात राहत नाही. आणि मोबाईलचे वेड लागल्यामुळे ही मुले घरीही अभ्यास करत नाही. अशी मुले मोबाईल वर अभ्यासाचे क्लास असतात, मोबाईल मधून अभ्यास करतो, असे नेहमीच खोटे सांगून अभ्यास न करता सतत गेम खेळत असतात व शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे पालकांनी अशा मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

सततच्या मोबाईलच्या वापरामुळे बऱ्याच मुलांना मोबाईलच्या वायरसमुळे मेंदूचे आजार झाल्याचे दिसून येत आहे. अशी मेंदूमध्ये वायरस गेलेली मुले तीन महिने कोमात गेल्यासारखी दवाखान्यात बेडवर पडून असतात तर डॉक्टरांकडे त्यावर योग्य इलाज नसतो. त्यामुळे पालकांनी लहान मुलांना किंवा विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवणे त्यांच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक झाले आहे. नाहीतर त्याचा विपरीत परिणाम दिसून येऊन अशा मुलांची आयुष्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

# जागतिक आरोग्य संघटना स्थापन हेतू!

**डब्ल्यूएचओच्या व्यापक आदेशात सार्वभौमिक आरोग्य सल्ला, सार्वजनिक आरोग्याच्या जोखमीवर देखरेख, आरोग्य आपत्कालीन प्रतिक्रियांचे समन्वय, मानवी आरोग्य प्रसार यांचा समावेश आहे. डब्ल्यूएचओने सार्वजनिक आरोग्यासाठी केलेल्या अनेक कामांमध्ये प्रमुख भूमिका बजावली आहे, विशेषतः रोग निर्मूलन, पोलिओचे निर्मूलन आणि इबोला, कोरोना लसीचा विकास आदी. त्याच्या सद्य प्राधान्यांमध्ये संसर्गजन्य रोगांचा समावेश आहे, त्यात एचआयव्ही– एड्स, इबोला, मलेरिया आणि क्षयरोग यांची वर्णी लागते. आणखी सविस्तर माहितीसाठी वाचा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांचा हा लेखनप्रपंच... संपादक.**

डब्ल्यूएचओ सरकारी आरोग्य धोरणाला दोन उद्दीष्टांसह संबोधित करतो– पहिली गोष्ट म्हणजे, आरोग्य समानता वाढवणारी, गरीब–समर्थक, लिंग–प्रतिसाद देणारी आणि मानवी हक्कांवर आधारित दृष्टीकोन एकत्रित करणारी धोरणे, कार्यक्रमांद्वारे आरोग्याच्या मूलभूत सामाजिक आणि आर्थिक निर्धारकांना संबोधित करणे होय. तर दुसरे म्हणजे, आरोग्यदायी वातावरणाला चालना देणे, प्राथमिक प्रतिबंध तीव्र करणे आणि आरोग्यास होणाऱ्या पर्यावरणाच्या धोक्यांमागील मूळ कारणांवर लक्ष केंद्रित करणे यासाठी सर्व क्षेत्रातील सार्वजनिक धोरणांवर परिणाम करणे होय.

डब्ल्यूएचओच्या तेरापैकी– ओळखल्या गेलेल्या पॉलिसी क्षेत्रांपैकी उर्वरित दोन डब्ल्यूएचओच्या भूमिकेशी संबंधित आहेत– जागतिक आरोग्य अजेंडा पुढे नेण्याच्या दृष्टीने डब्ल्यूएचओचे आदेश पार पाडण्यासाठी नेतृत्व, शासन, गती, भागीदारी व देश, संयुक्त राष्ट्र प्रणाली आणि इतर भागधारकांसह सहकार्य मजबूत करणे असते. डब्ल्यूएचओला एक लवचिक शिक्षण संस्था म्हणून विकसित करणे, टिकवून ठेवणे आणि त्याचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास सक्षम करणे महत्त्वाचे आहे. विश्व स्वास्थ्य संस्था ही आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सुसंवादाचे कार्य करणारी संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था आहे. ती दि.७ एप्रिल १९४८ रोजी स्थापन झाली. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हात मुख्यालय असणाऱ्या या संस्थेने एका अर्थी राष्ट्रसंघाचे एक उपांग असणाऱ्या आरोग्य संस्थेचे कार्य पुढे चालविले जात आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना सन १९४५च्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेदरम्यान चीनच्या प्रतिनिधी स्झमिंग स्झे यांनी नॉर्वे ब्राझीलच्या प्रतिनिधींना नवीन संयुक्त राष्ट्रांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्था तयार करण्याचे काम दिले. या विषयावर ठराव मंजूर करण्यात अपयशी ठरल्यानंतर परिषदेचे सरचिटणीस



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

अल्जर हिस यांनी अशी संघटना स्थापन करण्याच्या घोषणेचा वापर करण्याची शिफारस केली. स्झे आणि इतर प्रतिनिधींनी आरोग्याविषयी आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्याची घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेवर संयुक्त राष्ट्रांच्या सर्व ५१ देशांनी आणि इतर १० देशांनी दि.२२ जुलै १९४६ रोजी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे ही संयुक्त राष्ट्रांची पहिली विशेष संस्था बनली. त्याची स्थापना दि.७ एप्रिल १९४८ रोजी पहिल्या जागतिक आरोग्य दिनावर औपचारिकपणे अंमलात आणली. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीतील जागतिक आरोग्य संघटनेचे मुख्य उद्दीष्ट हे आहे, की जीवनाचे टाळण्यासारखे नुकसान, रोग आणि अपंगत्वाचे



ओझे कमी करण्यासाठी देश आणि इतर भागधारकांशी समन्वय साधणे. तब्बल १९४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी बनलेल्या डब्ल्यूएचए एजन्सीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणून ती काम करते. ३४ आरोग्यतज्ञ कार्यकारी मंडळाची निवड करून त्यांना सल्ला देते. डब्ल्यूएचए अधिवेशन महासंचालक निवडणे, ध्येय, प्राधान्यक्रम, बजेट आणि क्रियाकलाप मंजूर करण्यास जबाबदार असतो. विद्यमान महासंचालक टेड्रोस ॲधानम, माजी आरोग्यमंत्री आणि इथिओपियाचे परराष्ट्रमंत्री यांनी दि.१ जुलै २०१७ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ सुरू केला. दि.२३ जून १८५१ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलन, डब्ल्यूएचओचे पहिले पूर्ववर्ती होते. सन १८५१ ते १९३८ या काळात झालेल्या १४ परिषदांच्या आंतरराष्ट्रीय मालिका, आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलने यांनी कॉलेरा, पिवळा ताप यांसारख्या अनेक रोगांचा सामना करण्याचे काम केले. संमेलन यशाच्या परिणामी, पॅन–अमेरिकन स्वच्छता विभागाने आणि आंतरराष्ट्रीय कार्यालय– डी स्वच्छता पब्लिक लवकरच स्थापन करण्यात आले. सन १९२० मध्ये लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली, तेव्हा त्यांनी आरोग्य संघटनेची स्थापना केली.

दि.५ मे २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की पोलिओचा प्रसार हा जागतिक आरोग्य आणीबाणी आहे– आशिया, आफ्रिका आणि मध्य पूर्व या रोगांचा प्रादुर्भाव विलक्षण मानला गेला. दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की इबोलाचा प्रसार हा सार्वजनिक आरोग्य आणीबाणी आहे; ते गिनियामध्ये सुरू झाले. असा विश्वास होता, की हा उद्रेक जवळपासच्या इतर देशांमध्ये जसे की लाइबेरिया आणि सिएरा लिओनमध्ये पसरला होता.

दि.३० जानेवारी २०२० रोजी डब्ल्यूएचओने कोरोना– कोविड–१ हा साथरोग सर्व देशभर किंवा खंडभर असलेला सार्वजनिक आरोग्याची आणीबाणी म्हणून आंतरराष्ट्रीय चिंता जाहीर केली, हे येथे वाखाणण्याजोगेच म्हणावे लागेल!


!! विश्व स्वास्थ्य संस्था स्थापना दिनाच्या सर्वांना निरामय हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

### ‘चुनाव’ लघुपटाच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती

# स्थानिक कलाकारांचा समावेश आणि चंद्रपूर जिल्ह्यातच चित्रीकरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून या लोकशाहीत मतदानाला अत्यंत महत्व आहे. प्रत्येक पात्र नागरिकांनी आपला मतदान हक्क बजावला पाहिजे, या उद्देशाने चंद्रपूर जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्वीप मोहिमेअंतर्गत अनेक उपक्रम राबविले जात आहे. याचाच एक भाग म्हणून स्थानिक आदिवासी कलाकारांचा समावेश असलेला आणि संपूर्ण चित्रीकरण चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या ‘चुनाव’ या लघुपटाच्या माध्यमातून जीवती तालुक्यात मतदानाबाबत विशेष जनजागृती करण्यात येत आहे.



चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गम अशा जीवती व गोंडपिपरी तालुक्यातील स्थानिक आदिवासी समाजाला सोबत घेऊन जीवतीचे तहसीलदार अविनाश शेंबटवाड यांनी लेखन व दिग्दर्शन केलेला ‘चुनाव’ हा लघुपट सध्या मतदार जनजागृतीसाठी गावोगावी सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यात येत आहे. दुर्गम भागातील लोकांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम जीवती तहसीलतर्फे राबवण्यात येत आहे. या अंतर्गत जिवती, शेनगाव, पुडीयाल मोहदा, भोलापठार, महाराज गुडा, परमडोली या व इतर गांवामध्येसुध्दा सदर लघुपट दाखवण्यात येत आहे. विशेष म्हणजे स्थानिक कलाकारांचा सहभाग आणि आपल्याच जिल्ह्यातील चित्रीकरण असल्यामुळे या लघुपटाचे लोकांमध्ये आकर्षण आहे. मतदान करण्याची इच्छाशक्ती जागृत करणे, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे.लोकशाहीमध्ये निवडणुकीचे महत्व तसेच आदिवासी संस्कृतीचे उत्तम सादरीकरण या लघुपटातून करण्यात आले आहे. देशाच्या उज्वल भविष्यासाठी आणि सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे, असा संदेश यातून देण्यात आला आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन जीवती तालुक्याचे परिविक्षाधीन तहसीलदार अविनाश शेंबटवाड यांनी केले आहे. छायाचित्रण –अजय घाडगे, ध[illegible] संकलन –अथर्व मुळे, संगीत –तन्मय संचेती, सहायक दिग्दर्शन –सुरज वामन, कॅमेरा सहाय्यक –प्रणय भोयर व निर्मिती व्यवस्थापन –विराज टकले यांनी केले आहे.यामध्ये मुख्य भूमिका दिव्या राऊत, नानाजी कवाडे, गजानन रंगारी, सुवर्णा खर्डे, पोसुबाई कोडापे, लक्ष्मीबाई मडावी, झाडू मडावी, सोनेराव कुंभारे, मारुबाई कोडापे, कानुबाई मडावी आणि कान्हळगाव व कोलमगुडा येथील [illegible]

# राष्ट्रीय कोयला खदान मजदूर संघाचे क्षेत्रीय आयुक्तांना कामगारांच्या समस्यांविषयी निवेदन



**भद्रावती । प्रतिनिध**

सेवानिवृत्त कामगारांचा भविष्य निधी वेळेवर न मिळणे, विधवा पेन्शन प्रकरणे व रिवाइज पेन्शन प्रकरणे अनेक दिवसांपर्यंत पेंडिंग राहणे. आदी विविध समस्यांच्या त्वरित निवारणासाठी माजरी येथील राष्ट्रीय कोयला खदान मजदूर संघाद्वारे नागपूर येथील कोयला खान भविष्य निधी कार्यालयाच्या क्षेत्रीय आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले. कामगारांच्या पासबुक पोस्टींग अनेक दिवसांपर्यंत पेंडिंग राहत आहे,भविष्य निधीच्या पोर्टलवरील रकमेत विसंगती दिसून [illegible] रेकोनसीलेशन क्लियरन्स सर्टिफिकेट क्षेत्राला न मिळणे इत्यादी कामगारांच्या समस्या घेऊन नागपूर आयुक्त कार्यालयात आयुक्तांसोबत मजदूर संघाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत दोन तास या समस्यांवर चर्चा करण्यात आली.या सर्व समस्या एका महिन्याच्या आत निकालात काढल्या जाईल असे आश्वासन यावेळी आयुक्त जयंत चौधरी यांनी बैठकीला उपस्थित मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांना दिले. सदर बैठकीला माजरी क्षेत्रिय इंटकचे अध्यक्ष धनंजय गुंडावार, क्षेत्रीय सचिव परमानंद चौबे, क्षेत्रीय पदाधिकारी सुभाष बहादे, हंसराज पारखी, ओमप्रकाश वैद्य आदी उपस्थित होते.

# चंद्रपूर जिल्हयात भाजपा ओबीसी मोर्चाची कार्यकारणी गठीत

**वरोरा । प्रतिनिधी**

भाजपा ओबीसी मोर्चा चंद्रपूर ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. आगलावे यांची निवड



झाल्यापासून पक्षांनी दिलेल्या जवाबदारी पूर्ण करीत जिल्हयातील पंधरा तालुक्यामधील बावीस मंडळामध्ये संपूर्ण कार्यकारिणी गठीत करून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर ओबीसी मोर्चाची बांधणी मजबुत केल्याचे डॉ. अंकुश आगलावे यांनी एका पत्रकाव्दारे सांगितली आहे.

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संजयजी गाते व भाजपा जिल्हाध्यक्ष हरिशजी शर्मा यांचे सुचनेनुसार व मार्गदर्शानात संपूर्ण जिल्हयात डॉ. आगलावे यांनी भाजपा ओबीसी मोर्चाची कार्यकारिणी गठीत करून चंद्रपूर जिल्हयातील व तालुकातील कार्यकारणी मजबुत केली आहे.

प्रत्येक तालुक्यात अनेकांची पक्षात प्रवेश करून पक्षाला बळकट करण्याचे काम केले. यावेळी विजयाकडे वाटचाल करीत सुधीरभाऊ मुनगंटीवार हे बहुमताने निवडुण येवून चंद्रपूर जिल्हयाचे लोकसभेत प्रतिनिधित्व करणार असल्याचा विश्वासही यावेळी व्यक्त केला .

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा सरकारचा संयुक्त अरब अमिरातीला १० हजार टन कांदा निर्यात करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली**–कांदा निर्यातबंदीमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने यूएई अर्थात संयुक्त अरब अमिरातीला अतिरिक्त १० हजार टन कांदा निर्यात करण्याचा निर्णय घेतला असून, परकीय व्यापार महासंचालनालयाने यासंबंधीचे आदेशही जारी केलेत. ही निर्यात राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेडच्या (एनसीईएल) माध्यमातून होणार आहे. सरकारच्या या निर्णयाचा महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीअंशी लाभ होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. कारण, निर्यातबंदीमुळे कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना काहीअंशी लाभ पोहोचवण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीला अतिरिक्त १० हजार टन कांदा निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना किती फायदा होईल हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण त्यांना तूर्त दिलासा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे सरकारच्या या निर्णयामुळे कांद्याच्या दरात वाढ होईल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, कांद्याची ही निर्यात अत्यंत मर्यादित स्वरुपाची आहे. त्यामुळे सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना फारसा फायदा होणार नाही. कारण, सध्या शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात कांदा पडून आहे. पण निर्यातबंदीमुळे दर घसरल्यामुळे त्यांचे वांदे झालेत. सरकारच्या ताज्या निर्णयामुळे त्यांना आपल्याकडील कांदा काहीअंशी निर्यात करता येईल. पण त्यांचा त्यांना फारसा फायदा होईल असे वाटत नसल्याची शंका तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# महायुतीच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे शानदार उद्घाटन

**अहिल्यानगर** –लोकसभा निवडणूक प्रचारासाठी महायुतीच्या वतीने नगर येथील कोहिनुर मंगल कार्यालय येथे राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी मंत्री शिवाजी कर्डीले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला असून मोठ्या जोमाने कार्यकर्ते कामाला लागल्याने डॉ. सुजय विखे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. यावेळी पालकमंत्री विखे पाटील यांनी सकारात्मक भूमिकेतून लोकांच्या पुढे जा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली कामे आणि त्याचा देशाच्या विकासात पडलेली भर याची माहिती लोकांना द्या. त्याच



बरोबर महायुती सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात झालेली विकासकामे, विविध योजना आणि जनतेचे सुटलेले प्रश्न लोकांना दाखवा. विरोधात कोण याचा विचार न करता केवळ पंतप्रधान मोदी यांना पुन्हा देशाचे पंतप्रधान करायचे आहे याचा विचार करून कामाला लागा असा संदेश यांनी यावेळी दिला. यावेळी आमदार मोनिकताई राजळे, माजी आमदार चंद्रशेखर कदम, शिर्डी लोकसभा मतदार संघाचे उमेदवार सदाशिव लोखंडे, राष्ट्रवादी उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग उपस्थित होते. रिपाई, शिवसेना आणि इतर घटक पक्षातील मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. मान्यवरांनी जिल्ह्यातील विविध तालुक्यातील आलेल्या सर्व घटकपक्षातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले. तसेच निवडणूक प्रचारासाठी लावणारी सर्व मदत ही या कार्यालयातून केली जाईल असे सांगण्यात आले.

**बीड : शहरातील जालना रोड परिसरात लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



# आम्ही महाराष्ट्रात ही आमची चूक का? भीमा नदी काठच्या शेतकऱ्यांचा सवाल; केवळ दोन तास वीज

**सोलापूर (वृत्तसंस्था):** उजनीतून पाणी सोडल्यानंतर भीमा नदीवरील सर्व बंधारे भरून घेण्यात आले. मात्र, पिण्यासाठीच्या पाणीपुरवठा योजना असलेल्या बंधारा परिसरातील शेतीला केवळ दोन तास वीजपुरवठा केला जात आहे. तर कर्नाटकात सात तास वीजपुरवठा सुरू आहे.

या दुजाभावामुळे औज, कुरघोट, टाकळी व चिंचपूर या चार गावातील शेतकरी आम्ही महाराष्ट्रात राहतो ही आमची चूक का, असा सवाल विचारत आहेत. सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला या शहरांसह भीमा नदीवरील ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी ११ मार्चपासून उजनीतून पाणी सोडण्यात आले.

तेव्हा भीमा नदीच्या दोन्ही तीरावरील शेतीचा वीजपुरवठा बंद केला होता. २५ मार्चला पाणी हिळ्ळी बंधाऱ्यात पोहोचल्यानंतर नदीकाठावरील शेतीचा वीजपुरवठा चार तास करण्यात आला. मात्र, गुरसाळे, पंढरपूर, उचेठाण, औज व चिंचपूर या पाच कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या क्षेत्रातील शेतीला केवळ दोन तास वीजपुरवठा केला जात आहे.यापैकी औज व चिंचपूर या बंधाऱ्यांचे क्षेत्र कर्नाटक सीमेलगत आहेत. या दोन्ही बंधाऱ्यांच्या क्षेत्रातील औज, कुरघोट, टाकळी व चिंचपूर या गावांतील शेतीसाठी केवळ दोन तास वीजपुरवठा होत असल्याने पिके संकटात आहेत. तर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सतावत आहे. अशाप्रसंगी कर्नाटकात मात्र शेतीसाठी सात तास वीजपुरवठा होत आहे. त्यामुळे बंधाऱ्यांतून



पाण्याचा उपसा सुरू आहे.मे महिन्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने दक्षता घेत, महाराष्ट्रातील पाणी उपशावर नियंत्रण आणले आहे. मात्र, कर्नाटकातून शेतीसाठी ११ तास पाणी उपसा सुरू आहे. तेथे सात तास थ्री फेज तर चार तास टु फेज वीजपुरवठा होत आहे.टु फेज वीजपुरवठा सुरू असतानाही तांत्रिक फेरबदल करून पाणी उपसा सुरू आहे. औजसह चार गावातील शेतीला गेल्या चार महिन्यांपासून सतत दोन तास विजेवर शेती पिके जगविण्याची कसरत करावी लागत असताना,कर्नाटकातील पाणी उपशावर नियंत्रण का आणले जात नाही, असा सवाल शेतकरी विचारत आहेत. पाणी महाराष्ट्राचे, तरीही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर निर्बंध लादले जात आहेत. या दुजाभावपूर्ण नीतीमुळे आम्ही महाराष्ट्रात राहतो, ही आमची चूक आहे का, असा सवाल शेतकरी विचारत आहेत.भीमा नदीवरील भंडारकवठे बंधाऱ्यापासून हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत कर्नाटक सीमा आहे. भंडारकवठे ते टाकळी दरम्यान, कर्नाटकाच्या चार पाणी योजना आहेत. त्यासाठी २४ तास पाण्याचा उपसा होत आहे.त्यांच्यासह शेतीसाठी होणाऱ्या उपशामुळे पाणीसाठ्यात घट होत आहे. मात्र, दरवेळी उजनीतून पाणी सोडल्यावर विजेअभावी केवळ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पाणी उपशाच्या निर्बंधाला सामोरे जावे लागत आहे.चार महिन्यांपासून चार गावांतील शेतीला दोन तास वीज दिली जात आहे. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर जलवाहिनीद्वारे शेतापर्यंत पाणी पोहोचायला अर्धा तास वेळ लागतो. दीड तासात पिकांना पाणी देऊन जनावरांसाठीही पिण्याचे पाणी साठवावे लागते.

# 'तुम्ही जाल तिथे सैतानाचा फेरा!' आशिष शेलारांचे राऊतांवर टीकास्त्र

**मुंबई**–'उबाठा गटानेच काँग्रेसचे वाजवले तीनतेरा, तुम्ही म्हणजे जिथे जाल तिथे सैतानाचा फेरा! असे म्हणत भाजप नेते आशिष शेलार यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विरोध करणारे संजय निरुपम यांची काँग्रेसने ६ वर्षांसाठी हकालपट्टी केली. त्यानंतर त्यांनी संजय राऊत आमची काँग्रेसही संपवत असल्याचा आरोप केला. यावरून आशिष शेलार यांनी एक्सवर पोस्ट केली आहे.





आशिष शेलार यांनी पोस्टमध्ये लिहिले की, मध्यरात्र झाल्यानंतर शहरातील दोन संजय एकमेकांना भेटले! विश्वविख्यात हातवारे करीत, केसांचा कोंबडा उडवीत, मधेच मातोश्रीकडे पाठ आणि सिल्वर ओकच्या दिशेने कटाक्ष टाकीत..नजर शून्यात टाकून 'बाइट'चा हावभाव करू लागलेदुसरे संजय, काँग्रेसच्या पराभवाची कारणे बसले होते वाचत! ते बसले होते ती खुर्ची पण होती त्यांना टोचत! तू रोज बोलतोस, म्हणून अखखा पक्षच गेला सोडून, मी एकदाच बोललो आणि पक्षाला दिला राजीनामा फाडून! 'तसेच विश्वविख्यात म्हणाले, 'मला कशाला तुझ्या सोबत ओढतोस? फुटक्या आघाडीला आणखी कशाला फोडतोस? आम्ही म्हणजे आम्ही म्हणजे आम्ही म्हणजे आम्हीच.. काँग्रेस महाराष्ट्रात आमच्यासमोर कमीच! त्यावर रामभक्त संजय खवळले आणि म्हणाले, उबाठा गटानेच काँग्रेसचे वाजवले तीनतेरा, तुम्ही म्हणजे जिथे जाल तिथे सैतानाचा फेरा! सामना रंगतदार होणार म्हणून वेटर सगळे टेबलाभोवती जमले! गर्दी बघून दोघे ही सावरले बोलती बंद आणि संवाद सगळे थांबले, दोघांचे ही क्षणात चेहरे कसे कोरे यांच्या 'हास्यजत्रे'पेक्षा केव्हाही बरा आमचा प्रभाकर मोरे!'' अशी खोचक पोस्ट आशिष शेलार यांनी केली आहे.

# निवडणूक निरीक्षक श्रीमती एम.एस.अर्चना यांच्याकडून दूरस्थ मतदान केंद्रांची पाहणी



**हिंगोली**–हिंगोली लोकसभा मतदारसंघात आदर्श आचासंहिता लागू झाली असून, निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज जिल्ह्यातील दूरस्थ मतदान केंद्रांना भेटी देत पाहणी केली. यावेळी संपर्क अधिकारी सुनील शिंदे, श्रीमती पुष्पा पवार व नायब तहसीलदार श्री. गायकवाड उपस्थित होते. हिवरखेडा, बोरखेडी, लिंबाला व भंडारी या दूरस्थ मतदान केंद्रास भेटी देऊन तेथील मूलभूत सुविधाची पाहणी केली. मतदान केंद्रावर स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याचे पाणी या दोन सुविधा प्रामुख्याने उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.


यावेळी उपस्थित अधिकारी श्री. गायकवाड यांनी निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांना जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच तलाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपास्थित होते. तसेच त्यांनी गावातील मतदारांशी संवाद साधला.

मतदानावेळी मतदारांना किमान आवश्यक सुविधा पुरविणे आवश्यक आहे. सर्व संबंधितांनी मूलभूत सुविधांच्या उपलब्धतेची खात्री केली. या दूरस्थ मतदान केंद्रांवरील किमान आवश्यक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने त्यांनी पाहणी केली. मतदान केंद्रांवर आवश्यकतेनुसार डागडुजी, दुरुस्ती, सर्व मतदान केंद्रांवर प्रकाश, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, रॅम्प आदींच्या व्यवस्थेची पाहणी केली. ज्या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदार मतदान करतील तेथे व्हीलचेअर व स्वयं सेवकांची व्यवस्थेचीही तपासणी केली. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याच्या पुरेशा उपलब्धतेची दक्षता घेऊन आयोगाच्या सूचनांनुसार आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मतदान केंद्रावर पोहोचण्यास मतदाराना त्रास होणार नाही, याची दक्षता सर्वांनी घ्यावी. मतदानाची तारीख लक्षात घेता सावलीची व्यवस्था तसेच रांगेचे नियोजन करावे. सर्व मतदार केंद्रावर प्रथमोपचार सुविधा देताना आवश्यक औषधे मतदान केंद्रावर उपलब्ध ठेवण्यात यावीत, असे निर्देश निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी दिले.

# राहूल नार्वेकर यांच्या विरोधात आचारसंहिता भंग केल्याची तक्रार

**मुंबई**–विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष राहूल नार्वेकर दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघातील विविध नागरी प्रश्नांबाबत आपल्या दालनात बैठका घेत असून संबंधितांना कामे करण्याचे आदेश देत असतात. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे.निवडणूक आयोगाला ४ एप्रिल रोजी पाठवलेल्या पत्रात राहूल नार्वेकर यांनी आचारसंहिता काळात घेतलेल्या या बैठकांचे तपशीलही देण्यात आले आहेत.राहूल नार्वेकर यांनी २ एप्रिल रोजी त्यांच्या दालनात एक बैठक घेतली. या बैठकीला म्हाडा प्रधिकरणाचे अधिकारी, मुंबई महापालिकेच्या जलविभागाचे अधिकारी व इतर शासकीय अधिकारी उपस्थित असल्याचे या पत्रात म्हटले आहे. अशा बैठकांमध्ये विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर अधिकाऱ्यांना नागरी कामे करण्याचे आदेश देत असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले असून या बैठकींच्या पुराव्यांसाठी अभ्यागतांची नोंदवही त्याचप्रमाणे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची विनंती आयोगाला करण्यात आली आहे. या संदर्भातील पुरावे तातडीने जप्त करण्याचीही विनंती करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्षासारख्या उच्च संवैधानिक पदावरील व्यक्तीने अशा प्रकारे आदेश देऊन आदर्श आचारसंहितेचा भंग करणे गंभीर असल्याचेही या पत्रातून आयोगाच्या निर्देशनास आणून देण्यात आले आहे. आयोगाने या प्रकरणाची गंभीर नोंद घेण्याचे आवाहनही याचिकाकर्त्यांने आपल्या पत्रात केली आहे.

### छाप्यात जप्त करण्यात आलेली रक्कम
# आयकर विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे सुपूर्द



**अहिल्यानगर** –स्थानिक गुन्हा शाखेने अहमदनगर शहरामध्ये छापा मारुन ७३ लक्ष २४ हजार ५०० रुपयांची रक्कम जप्त केली होती. यापैकी ६९ लक्ष ४४ हजार ५०० रुपये एवढ्या रक्कमेचे योग्य स्पष्टीकरणे न मिळाल्याने ही रक्कम आयकर विभागाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली असुन उर्वरित ३ लक्ष ८० हजार रुपयांची रक्कम योग्य स्पष्टीकरण मिळाल्याने कृष्णा विजय भगत, बोल्हेगाव यांना सुपूर्द करण्यात आली असल्याची माहिती मुख्य लेखा वित्त अधिकारी तथा खर्च सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अहमदनगर शहरामध्ये २१ मार्च, २०२४ रोजी छापा टाकुन रक्कम जप्त करण्यात आली होती. जिल्हा तक्रार निवारण समितीने आयकर विभागाला चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या. आयकर विभागाने दिलेल्या अहवालानुसार ही कार्यवाही करण्यात आली असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याच्या निर्णयाचा विरोध

**छत्रपती संभाजीनगर**–पैठणच्या नाथसागरातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले असतांनाही आणी या पाण्याचे योग्य तसे नियोजन करता येत असतांनाही याकडे पैठण नगर परिषदेच्या प्रशासकांनी व पाणीपुरवठा विभागाने साफ दुर्लक्ष करून पैठण शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्यामुळे पैठणकर चांगलेच संतापले आहेत. या बाबीची विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी एक पथक नियुक्त करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी पैठण येथील नागरिकांनी केली आहे.

पाणीपुरवठा करणारी यंत्रणा मोठ्या प्रमाणात कुचकामी झाली असून फक्त 'काम चलाव' या पद्धतीचा वापर करून कसेबसे पैठण शहराला पाणीपुरवठा केला जातो. तो ही दररोज फक्त वीस ते तीस मिनिटे, दिवसातुन एक वेळा त्यामुळे पूर्ण क्षमतेने रहिवाशांना नळाद्वारे नियोजित वेळेवर पुरेसे पाणी मिळत नसल्याची ओरड नागरिक करतात, पण त्यांची साधी दखलही घेतली जात नाही.पंप हाऊस यंत्रणा कधीही धोका देऊ शकते त्यामुळे एक दिवसाआड पाणी देण्याचा खटाटोप केल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. पंपहाऊसला यापूर्वी एक्सप्रेस वीज कनेक्शन दिले होते ते कनेक्शन केव्हा बदलले हा एक संशोधनाचा विषय आहे. पंप हाऊसला कायमस्वरूपी जलद गती वीज कनेक्शन विद्युत मंडळाने जोडावे, असा निर्णय नाथषष्ठी बैठकीत झाल्यावरही पंप हाऊसची लाईट अधून मधून जाणे असा प्रकार चालूच आहे, त्याचाही फटका नागरिकांना बसत असून त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

# माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे सह इंदापूर तालुक्याचे पालकत्व स्विकारले आहे–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**इंदापूर**–दि.(०५) रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे इंदापूर येथे कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी आणि त्यांचे महाराष्ट्रातून लोकसभेच्या माध्यमातून हात बळकट करण्यासाठी मी आज इंदापूर येथे आलो आहे.

आपण विधानसभेची काही काळजी करू नका मी इंदापूर सह हर्षवर्धन पाटील यांचेही पालकत्व स्वीकारत आहे,असे ते जाहीर सभेत म्हणाले.

अंकिता पाटील/ठाकरे यांनी इंदापूर तालुक्यातील विकास कामांचा आढावा घेतला.आणि म्हणाल्या की आमच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून भरपूर त्रास दिला जात आहे.भाजपच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत.आम्हाला मागील चार विधानसभेला फसवले आहे.म्हणून भाजपच्या सर्वसामांन्य कार्यकर्त्यांमध्ये चिड निर्माण झाली आहे.आम्ही लोकसभेला प्रामाणिकपणे काम करतो परंतु आम्हाला विधानसभेला दगा फटका होणार नाही याची काळजी आपण स्वतः घ्यावी अशी विनंती उपमुख्यमंत्री यांना अंकिता पाटील ठाकरे यांनी केली.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की आम्हाला प्रत्येक विधानसभेला फसवलेले आहे.त्यामूळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. कार्यकर्त्यांची लोकसभेला घड्याळाला मतदान करण्याची इच्छा नाही परंतु फडणवीस साहेब जे आदेश देतील तोआम्हाला मान्य आहे.

माजी सभापती प्रविण माने यांनी प्रचारातुन मध्येच माघार घेतली.अशी सभेच्या ठिकाणी जोरदार चर्चा चालू होती.कारण हेलीपॅडच्या ठिकाणी प्रविण माने आले आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घेऊन थेट घरी गेले.त्यामुळे प्रविण माने भाजपा मध्ये जाणार अशी जोरात चर्चा सभास्थळी चालू झालेली पाहावयास मिळाली.माने यांनी देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले आणि घरी चहासाठी येण्याची विनंती केली, लागलीच फडणवीस हे माने यांच्या निवासस्थानी पोहचले. यानंतर पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले माने यांच्याशी माझे घरगुती संबंध आहेत,यावर माने यांनी सांगितले की, तुम्ही नेहमी येत असता, मात्र माझ्या घरी आलेच नाहीत, आता चहाला यावे.तेव्हा चहासाठी येण्याची विनंती केली, त्यामुळे मी तेथे गेलो, अर्थात माने हे जुने सहकारी आहेत आणि तसे ते आमचेच आहेत,असे सांगत यातील ट्विस्ट आणखीणच वाढवला.यामुळे येणाऱ्या काळात पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण माने यांच्या राजकीय भूमीकडे इंदापूर तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. यावेळी दौंड चे आमदार राहुल कुल,पृथ्वीराज जाचक,वासुदेव काळे,अंकिता पाटील /ठाकरे, संपतराव बंडगर,राजवर्धन पाटील, पराग जाधव,ईत्यादी प्रमुख मान्यवरांसह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# ज्ञानराधा वरील ठेवीदारांचा विश्वास सार्थ ठरण्याच्या दिशेने

## पोलीस प्रशासन, कर सल्लागार व शिष्टमंडळासमोर माहिती सादर

**बीड । प्रतिनिधी**

गेली अनेक दिवसापासून सहकार क्षेत्रातील मल्टीस्टेट पतसंस्था वरील संकटामुळे जे वादळ मराठवाड्यात चालू आहे. या वादळातील कुटे ग्रुपच्या माध्यमातून ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेवीदारांचा आक्रोश जो निर्माण झाला होता त्या आक्रोशाला सामोरे जात असताना कुटे ग्रुप ने परत एकदा शिष्टमंडळातील, पोलीस प्रशासनातील अधिकारी, चार्टर्ड अकाउंटंट यांच्या समक्ष जो आलेला फंड, येणाऱ्या फंड आहे तू कशा पद्धतीने रिलीज होणार आहे. या विषयी माहिती सादर केली ती माहिती कुठेतरी दिशा दर्शक वळणावर असून ठेवीदारांच्या प्रश्नावर यशस्वी काम होऊन त्यांच्या ठेवी सुखरूप त्यांना वापस देण्यात कुटे ग्रुप सक्षम असताना समक्ष सर्व तज्ञांनी अभ्यास करून ठेवीदारांना दिलासा नक्कीच मिळणार हे या बैठकीतून समोर आले.




अनेक गोष्टीला तोंड देत असताना कुटे ग्रुपचे सर्वेसर्वा सुरेश कुटे हे ठेवीदार समोर येत नसून त्यांनी पलायन केले असे अनेक अफवांचे पेव निर्माण झाले होते त्या संदर्भात अनेक आरोप त्यांच्यावर करण्यात आले होते परंतु या आरोपाचं खंडन होताना या ठिकाणी दिसत आहे पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट सत्यनारायण लोहिया साहेब प्रा.सचिन उबाळे आधारस्तंभ म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते व पोलीस प्रशासनातील पी.आय हरिभाऊ खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानराधा कुटे ग्रुप यांनी ज्या कंपनीशी आपल्या आर्थिक विषयावर तोडगा निघावा म्हणून जे कुटे ग्रुपने काम केलं आहे ते खरोखरच आहे की अफवां आहे हे पाहण्यासाठी अधीक्षक साहेब यांच्या मध्यस्थीने एक शिस्ट मंडळ सोलापूर या ठिकाणी कुटे ग्रुपच्या अर्चना कुटे यांच्या समवेत झालेल्या बैठकीत कामाचा लेखाजोखा मांडण्यात आला व तो योग्य दिशादर्शक व खरोखरच त्यावर काम चालू आहे हे या बैठकीत दिसून आल्यानंतर ठेवीदारांना विश्वास देण्याचं काम या बैठकीत उपस्थित सर्वांनीच ठेवीदारांना आव्हान केले गेले की आपली ठेवी ही सुरक्षित असून नक्कीच ती आपल्या ला सुपूर्त होणार आहे असा विश्वास या बैठकीत आम्हाला सर्वांना दिसून आला आहे आणि तो आपणही सर्वांनी विश्वास ठेवा असाच सर्व उपस्थितांच्या विचारातून सूर निघला.

कुटे ग्रुप व ज्ञानराधा परिवारावरील सहा महिन्यापासून आर्थिक विषयाचे जे संकट आले आहेत या संकटाला माझ्या बीड वासीयांनी माझ्या ज्ञानराधा परिवारातील सदस्यांनी जो आजपर्यंतचा विश्वास दाखवला आहे त्या विश्वासाला आमच्याकडून कुठल्याही प्रकारचा तडा दिल्या जाणार नाही परंतु ज्या काही आम्हाला फंड उभा करताना टेक्निकल अडचणी असो इतरत्र अडचणी असो याला सामोरे जावे लागले यामुळे आपल्या ठेवी देण्यास आम्ही वारंवार तारखा देऊन त्या आमच्याकडून मिस होत गेल्यामुळे आपल्या आक्रोशास आम्हालाही सामोरं जावा लागले आणि वेळेअभावी आपल्या समोरासमोर येऊ शकलो नाहीत परंतु सन्माननीय नंदकुमार ठाकूर, अधीक्षक साहेब ,पी आय. खाडे साहेब यांनी आपल्या सर्वांसाठी जे यशस्वी प्रयत्न केले आम्हाला प्राध्यापक सचिन उबाळे, सत्यनारायण लोहिया व सर्व ठेवीदार उपस्थित यांना आम्हाला समोरासमोर आणण्याचे जे प्रयत्न केले त्यांचे शतशः आभार या ठिकाणी व्यक्त करते व ठेवीदारांनी आमच्यावर आजपर्यंत जो विश्वास ठेवला आहे तो थोडे दिवस विश्वास ठेवावा आणि येणाऱ्या दोन ते तीन दिवसात आपणास पुढील कामकाजाची पद्धत ज्ञानराधा वरील कर्मचाऱ्यांचा आराखडा ज्ञानराधा काय काम करेल याविषयी विस्तृत माहिती आपल्यापर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असेल प्रत्येक खातेदार हा आमचा परिवार आहे त्या परिवाराला आमचा अधिकारी हा फोन लावून बोलेल त्याच्या आलेल्या संकटावर त्याच्या पैशाचे नियोजन कसे केले जाईल हे व्यक्तीशहात स्वतः त्याला सांगण्याची जबाबदारी आमची आहे आणि ती आम्ही नक्कीच पार पाडू आणि सर्व ठेवीदारांचे परत एकदा आभार व्यक्त करेल की तो आजपर्यंत विश्वास आमच्यावर आहे तोच कायम विश्वास ठेवा. **–अर्चना सुरेश कुटे**

मराठवाड्यातील ठेवीदारांच्या सहा महिन्यापासून असलेला आक्रोशाला व ठेवीदारांनी माझ्यावर ठेवलेले विश्वासाला तडा न जाऊ देण्यासाठी ठेवीदारांच्या प्रत्येक आवाज आला मी त्याला समोर आलो परंतु मुजोर मल्टीस्टेट वाल्यांनी ठेवीदाराचा अंत पाहू नये अशीच माझी ठेवीदाराविषयी कळकळ राहिलेली आहे परंतु संचालक हे ठेवीदार ना खेळवण्याचे काम करत होते प्रत्यक्ष समोर येत नव्हते परंतु पोलीस अधीक्षक साहेबांच्या मध्यस्थीने कुटे ग्रुप व आम्ही समोरासमोर येऊन जी चर्चा केली ती चर्चा सकारात्मक सध्या झाली आहे येणाऱ्या फंडवर तो कशा पद्धतीने येणार आहे काही कालावधी त्याला नक्कीच लागणार आहे परंतु तो आपल्याला मिळणार आहे हा विश्वास त्यांनी आम्हाला समोरासमोर दिल्यामुळे व ठेवीदाराचा एकही रुपया बुडलेल्या जाणार नाही ही हमी सौ अर्चना कुटे यांनी दिल्यानंतर व स्वतः सुरेश कुटे यांना घेऊन ठेवीदारासमोर आणण्याचे कबूल केल्यानंतर आम्ही हे त्यांच्यावर विश्वास ठेवून तुमचे भावना आम्ही समजू शकतो आपलेही आपल्यावरचे ही संकट जावे व पूर्ववत आपण जे नाव केलेलं आहे ते भारतात न राहता जगात जावे अशाच शुभेच्छा प्राध्यापक सचिन उबाळे यांनी दिल्या आणि ठेवीदारांना शांत राहण्याचे आवाहन केले नक्कीच आपला एक एक रुपया आपण यांच्याकडून घेऊ अशीही आश्वासित केले. **–प्राध्यापक सचिन उबाळे**

अनेक दिवसापासून ठेवेदारांच्या प्रश्नावर प्राध्यापक सचिन उबाळे ही लढा देत असताना कायद्याच्या बाजूने लढा देण्यासाठी त्यांनी आम्हाला त्यांच्या लढ्यात सामील होण्यासाठी सांगितले आणि अनेक ठेवीदारांचा ज्वलंत प्रश्न हा असल्यामुळे आपणही या देशाचे नागरिक आहोत आणि या लढाईत आपणही उतरले पाहिजे प्राध्यापक सचिन उबाळे यांच्या हात बळकट करून ठेवेदारांना त्यांचा पैसा मिळाला पाहिजे ही भावना मनात धरून आज कायदे विषयी मार्गदर्शन करत असताना आज या शिष्टमंडळात मी आलो आणि या शिष्टमंडळाच्या माध्यमातून जो काही प्रश्न आज मार्गे निघाला आहे ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या माध्यमातून ठेवीदारांना प्रत्येक त्यांचा ठेवीचा पैसा हा लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करणार आहोत असा विश्वास समक्ष सौ अर्चना कुठे यांनी दिल्यानंतर तोही आम्ही मान्य केला आणि प्रत्येक विधाराचा पैसा हा लवकरात लवकर द्यावा अशी विनंती त्यांना केली तरी ती विनंतीला त्यांनी मान देऊन नक्कीच आपला एक एक रुपया आम्ही देणार असेही आश्वासित केले यामुळे ठेवीदारांनी शांत संयमाने आपण आपल्या आरोग्याची काळजी घेऊन हा पैसा आपण कसा लवकरात लवकर घेऊ यासाठी त्यांनाही सहकार्य करण्याची गरज आहे ते सहकार्य आपण करावे एवढीच या बैठकीत आपणास आवाहन करेल. **–ॲड.सावंत**

शिस्ट मंडळ व प्रशासनाने मध्यस्थी करून ठेवीदारांच्या होत असलेल्या आर्थिक प्रश्नावर सर्व आम जनता म्हणून मी या प्रश्नात कुठेतरी मध्यस्थी करणे व आपल्या माहिती प्रमाणे या लोकांना योग्य ती माहिती मिळावी अशी विनंती शिस्ट मंडळातून करण्यात आली त्या विनंतीला मान देऊन मी कुटे ग्रुपच्या माध्यमातून जे काही डॉक्युमेंट्स व त्यांचे फंड येण्याचे नियोजन हे समोर आले ते नक्कीच येणारा काळात थोडा वेळ लागेल पण नक्कीच येतील येऊ शकतात. तसेच कर्ज वसुली व येणारी येणे यातून नियोजन करणार असे सर्व गोष्टी माझ्यासमोर आल्या या कारणाने ठेवीदाराने नक्कीच आपला संयम ठेवणे व ज्ञानराधा वर विश्वास ठेवून शांततेत आपल्या ठेवी घ्याव्यात एवढेच सर्वांना नम्र विनंती चे आव्हान असेल **–सत्यनारायण लोहिया प्रसिद्ध करसल्लगार**

सन्माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब यांच्या आदेशानुसार आम्ही ठेवीदारांच्या हिताचा निर्णय व त्यांना त्यांची रक्कम मिळावी हाच उद्देश समोर ठेवून शिस्त मंडळ व कुटे ग्रुपचे एकामेका चे आरोप प्रत्यारोपाला कुठेतरी खंडन मिळावे या उद्देशाने दोन्ही लोकांना समोरासमोर आणण्याची भूमिका सामंजस पणाची भूमिका आम्ही पार पाडली त्यात त्यांचे अभ्यासक अड , कर सल्लागार , तज्ञ मंडळी प्रा. सचिन उबाळे यांनी यांच्या समक्ष दाखवलेल्या प्रत्येक गोष्टीचे परीक्षण केले त्यात त्यांचे समाधान झाले यामुळे नक्कीच ही बैठक यशस्वी झाली व स्वतः सुरेश कुटे हे पाच ते सात दिवसात समोर येऊन सर्व ठेवीदारांना बँकेच्या कामकाजाचे पुढील आव्हान करणार आहेत. **–पी एस आय हरिभाऊ खाडे**

# यंदाच्या निवडणुकीचे नेतृत्त्व जनतेने स्वतः आपल्या हाती घेतले आहे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यंदाच्या निवडणुकीचे नेतृत्त्व जनतेने स्वतः आपल्या हाती घेतले आहे. त्यांच्या मनाचा निश्चय झाला आहे. त्यांच्या मनाचा निश्चय झाला आहे. चंद्रपूरचे भाजपा उमदेवार सुधीर मुनगंटीवार हे अत्याधिक मोठ्या मताधिक्याने विजयी होणार आहेत.असे मत उत्तर प्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य दिनेश शर्मा यांनी येथे व्यक्त केले.



चंद्रपूरच्या एनडी हॉटेल येथे ५ एप्रिल रोज शुक्रवारला सायंकाळी भाजपा कडून पत्रपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तिथे ते बोलत होते. विदर्भाच्या दौर्यावर असलेले

दिनेश शर्मा यांनी, या संपूर्ण परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ८ एप्रिलला होणार्या जाहीर सभेसाठी मोठा उत्साह असल्याचे सांगितले. काँग्रेसने त्यांचा जाहीरनामा प्रकाशित केला. पण तो केवळ फार्स आहे. आम्ही जाहीरनामा देत नसतो, तर संकल्पपत्र जनतेला समर्पित करीत असतो. गत संकल्पपत्रात आम्ही जे म्हटले होते ते सर्व केले. मग श्री राम मंदिरचा विषय असो, की ३७० कलम, सिएए, आयुष्यमान भारत योजनेतून जनतेला ५ लाखाचा आरोग्य विमा देणे असो आम्ही करून दाखवले. मोदी यांच्या नेतृत्वात भारत आता याचक नाही, तर दाता आहे. अवघ्या जगात भारताची शान वाढली आहे, असेही ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांच्यासाठी संपूर्ण देश कुटुंब आहे आणि देशवासियांचे कल्याण हेच त्यांचे एकमेव ध्येय आहे. राष्ट्रवादी पक्ष आणि घराणेशाहीचा पक्ष यांच्यातील ही लढाई आहे आणि ती भाजपा नक्कीच जिंकेल, असा दावाही शर्मा यांनी यावेळी केला. मंचावर भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, प्रमोद कडू उपस्थित होते.

# मूल शहरातील मुस्लिम बांधवांसह अनेक युवकांचा शिवसेना उ.बा.ठा.पक्ष्यात प्रवेश

**मुल । प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात दिवसेंदिवस होणारा बदल व सध्याची परिस्थिती बघता युवकांचा कल शिवसेना ठाकरे गटाकडे वाढतच आहे. देशातील राजकरण जाती भेदीचे सुरु असताना राज्यांत मात्र पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचे विचार सर्व धर्म समभावाचे असुन ८० टक्के समाज कारन आणि २० टक्के राजकरण या विचारावर अनेक युवकांचा कल मात्र शिवसेना उबाठा कड़े वळून राहिला आहे. याच विचाराची मशाल घेऊन जय भवानी जय शिवाजी च्या जय घोश्यात



मुल शरातील मुस्लिम बांधव समवेत अनेक युवकांनी शुक्रवार दि.५ अप्रैल.रोजी शिवसेना (उ.बा.ठा) प्रवेश केला.

सदर पक्षप्रवेश कार्यक्रम शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांचे उपस्थितीत शिवसेना कार्यालय येथे पार पडला.

शिवसेना कार्यालय आज सर्व धर्म समभावांचे मंदिर बनले असुन संदीप भाऊंच्या मार्गदर्शनात प्रशांत गट्टूवार यानी अरबाज भाई शेख, सय्यद उर्फ बाबू सय्यद अली,इमरान शेख,इरशाद पठान सूरज अत्राम सैफ महाजन, यांच्या गळ्यात दुपट्टा टाकत शिवसेना परिवारात स्वागत केले.

या वेळी शहर प्रमुख अमित आयलानी यांची प्रमुख उपस्थिति होती.

पक्षप्रवेश घेनारे इमरान शेख,सौरव गिरडकर,कृष्णा अंमदुर्तिवार,सरफराज पठान,सन्नी रिजवी,तोहिद शेख याटो यूनियन सदस्य,यासीर शेख, तोफिक पठान,समीर शेख तसेच असंख्य मुस्लिम बांधव समवेत अनेक कार्यकर्त्यांच शिवसेनेत प्रवेश घेण्यात आला.

# योग क्षेत्रात प्रवीण्य प्राप्त कु.प्रांजल बोराडे यांचा सत्कार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्थानिक चंद्रपूर येथे दि.६/०४/२०२४ ला पवनसूत योग वर्ग रामनगर येथे रुद्र योगपीठ ऋषिकेश इथून २०० तासांचे योग प्रशिक्षण प्रविण्यासाह पूर्ण केलेल्या कु. प्रांजल मनीष बोराडे यांचे स्नेहपूर्ण स्वागत व सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहल्यास अनुमोदन करताना, आयुष्यात काहीही प्राप्त करण्यासाठी आंतरिक प्रेरणा जिद्दीची आवश्यकता असते जो व्यक्ति आपल्या पूर्ण शक्तिणीशी एखाद्या गोष्टीला प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची परकंष्टा करतो यश त्याच्या पायाशी लोटांगण घातल्या शिवाय राहत नाही असे आपले मनोगत योग



शिक्षक मधुकर राजूरकर जिल्हा सह प्रभारी भारत स्वाभिमान यांनी व्यक्त करील कु. प्रांजल ला भर भरून शुभेच्छा दिल्या. कु. प्रांजलचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे या शब्दात आजोबा श्री. भालचंद्र डाहाके यांनी कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. श्रीराम सेवा मंडळाच्या सदस्या व योग शिक्षिका उषाताई मडावी,संगीता ताई लांजेवार, मायाताई बेले यांनी शाल श्रीफळ व रोपटे देऊन शुभेच्छा दिल्या. कु. प्रांजल नि चित्त थरारक अशा कठीण असणाची मालिकाच सादर केली. व कोणत्याही आजारापासून सुटका करावयाची असल्यास योग प्राणायामची नियमित सवय लावून घेण्याचा सल्लाही दिला. श्री. विजयजी चंदावर जिल्हा प्रभारी भारत स्वाभिमान न्यास, श्री. शरदजी व्यास संघटन मंत्री पतंजली योग समिती, रमेशजी दादगाल, सुधाकरजी श्रीपूरवार, मुरलीधरजी शिरभैय्या, अशोकजी सांगिडवार, अरविंदजी सोनी, हरिदासजी कापटे, प्रकाशजी कसर्लेवार, केशवजी मेश्राम, सपना नामपाल्लीवर यांनी प्रांजलचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. तसेच पवन्सूत योग वर्गाच्या सदस्या मायाताई कारेकर, अनिताताई खामनकर, अल्का मंडल, विनाताई साखरकर, वृंदा बुरडकर, बेबीताई इंदूरकर, श्री. नागोसे साहेब सर्वांनी शुभेच्छुक दिल्या. या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक मधुकर राजूरकर तर समारोप भालचंद्र डाहाके यांनी केला.

# भामरागड येथे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा प्रचार कार्यालयाचे शुभारंभ

**भामरागड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात विविध राजकीय पक्षाचे प्रचार व जनसंपर्क कार्यालये उघडण्यात येत आहेत व आपल्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देऊन प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचे आव्हान जनतेला देण्याचे काम जोमाने सुरु आहे. गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली – चिमूर या लोकसभेकरिता उभे असलेले उमेदवार इंडिया आघाडी तथा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ व कार्यकर्त्यांना प्रचार दरम्यान विसावा घेण्याकरिता तसेच बैठका आणि चर्चे करिता आज (६ एप्रिल) तालुका मुख्यालयातील भामरागड येथे प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी तालुका अध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस पक्ष लक्ष्मीकांत बोगामी, महिला तालुका अध्यक्ष शारदा कंबोगोनिवार,जेष्ठ नेते तथा माजी अध्यक्ष नगर पंचायत भामरागड राजू वड्डे,तालुका अध्यक्ष आदिवासी विद्यार्थी संघटना सुधाकर तिम्मा, माजी सभापती पंचायत समिती भामरागड सुखराम मडावी,प्रतिष्टीत व्यापारी तथा राष्ट्रीय काँग्रेस चे नेते आसिफ सुफी, वामन ऊईके,विजय कुडयामी, कोलू पुंगाटी, दसरू लेकामी, सत्तू मट्टमी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .